नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/०३/२०२५ ( मंगळवार ) दुपार

# शेतमाल चोरी करणाऱ्या आतंरराज्यीय दोन अट्टल गुन्हेगारांना मौदा पोलीसांनी केली अटक

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २३/०३/२०२५ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथे फिर्यादी नामे रोशन हुसेन शेख, वय ५९ वर्षे, रा. गुमथळा ता.कामठी, जि.नागपुर यांनी तक्रार दिली की, दिनांक २१/०३/२०२५ चे १९/३० वा. ते दिनांक २२/०३/२५ चे ०७/०० वा. दरम्यान अज्ञात चोरटयांनी गुमथळा शिवारातील शेतातील नवीन काढुन ठेवलेल्या गहु पिकांचे ३५ कट्टे वजनी प्रती कट्टा ६० किलो प्रमाणे किंमती ५२,५००/—रूपये चा मुद्देमाल चोरी करून घेवुन गेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस ठाणे मौदा येथे अप.क्रं. २४५/२५ कलम ३०३(२) भा.न्या.स. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयात चोरीस गेलेल्या मालाचा शोध घेण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे यांनी पोलीस स्टेशन मौदा येथील गुन्हे शोध पथकाला आदेशीत केले. सुचना प्रमाणे गुन्हे शोध पथकाने गुन्हा करण्याची पध्दत व गोपनीय मुखबीरांच्या माहीती वरून मध्यप्रदेश येथील राहणारे आरोपी नामे १) रामप्रसाद रिखीराम राय वय. ३० वर्षे, रा.चिखला, ता.बादलपार, जि. सिवनी (मध्यप्रदेश) २) राहुल हेमनदास पडवार, वय.२० वर्षे, रा.जोगाटोला, ता.कटंगी, जि. बालाघाट रामगढ, (मध्यप्रदेश) यांना मौजा महाल गाव शिवारातील सुरज ढाबाचे जवळुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी दोघांनी ही मिळुन मौजा कटंगी जिल्हा. बालाघाट मध्यप्रदेश येथुन चारचाकी वाहन महेद्रा बोलेरो पिक अप क्रं. एम. एच. ४० वाय.२५४५ ही चोरी केल्याचे व त्याच वाहनाने मौजा गुमथळा व महालगाव शिवारातुन तीन वेगवेगळया ठिकाणाहुन शेतमाल चोरी केल्याची कबुली दिली असुन तसेच त्यांचे कडुन गुन्हयातील चोरीस गेलेला तुर, चना, व गहु असा शेतमाल एकुण ९५ कट्टे किमती १,८६,०००/रू चा मुदेमाल

व गुन्हयात वापरलेले वाहन महेद्रा बोलेरो पिकअप क्रं.एम.एच.४०वाय.२५४५ किमती ३,००,०००/रूपये असा एकुण किमती ४,८६,०००/रू चा मुदेमाल जप्त करूण ताब्यात घेतला. नमुद आरोपीतांना अटक करण्यात आलेली असुन चोरीचा माल विकत घेणारा आरोपी नामे **विठुबाबा बळीराम माटे वय.३२ वर्षे रा. उमरेड** यास सुध्दा ताब्यात घेतले असुन गुन्हयाचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.




## शोरूम पेक्षा कमी भावात दुचाकी विक्री करित असल्याचे दर्शवुन ग्राहकांना आमिष देवुन ग्राहकांची फसवणुक करणाऱ्या आरोपीला केली अटक,

## अरोली पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन अरोली** :— येथे प्राप्त तक्रार या प्रमाणे कोदामेंढी येथे **श्याम ॲटोमोबाईल सेल्स ॲन्ड सर्विस सेंटर** नामक दुचाकी विक्रीचे शो—रूम उघडुन ग्राहकांना इतर शोरूम पेक्षा कमी भावात दुचाकी विक्री करीत असल्याचे दर्शवुन आकर्षीत केले. ग्राहकांकडुन नगद किंवा बॅक खात्यात ,ऑनलाईन तसेच चेकद्वारे पैसे स्विकारून वाहन ग्राहकांच्या ताब्यात दिले. परंतु

नमुद प्राप्त रक्कम नागपूर येथील मेन ॲथोराईज डिलर टिव्हीएस साई डायनामीक ॲटोव्हील्स, नागपूर यांच्या कडे जमा न केल्याने ग्राहकांनी विकत घेतलेल्या दुचाकीचे रजिस्ट्रेशन व पासींग आरटीओ मार्फत झाले नाही. त्यामुळे ग्राहकांनी विकत घेतलेल्या वाहनांचे कागदपत्रे संबधीत ग्राहकांना प्राप्त झाले नाही.

यावरून पोस्टे अरोली येथे रजनीकांत प्रभु कांबळे, रा. बोरी, ता. तुमसर, जि. नागपूर याच्या रिपोर्ट वरून दि. ३१/१२/२०२४ रोजी आरोपी श्याम धनराज बांडेबुचे रा. कोदामेंढी, ता. मौदा, नागपूर यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. तपास दरम्यान फिर्यादी सारखेच फसवणुक झालेले १८ तक्रारदारांनी पोलीस स्टेशन मध्ये येवुन जबाब नोंदविले १८ ग्राहकां कडुन आरोपीने १८,८६,४९३/— रूपये स्विकारून त्यांची फसवणुक केली. तसेच हिरो उन्नती व्हिल्स शोरूम नागपूर यांचे कडुन १७ मोटार सायकल चे १५,९७,८९०/— रूपये तसेच टिव्हीएस साई डायनामीक ॲटोव्हील्स, नागपूर यांचे कडुन ११ मोटारसाय कलचे १०,३४,१८९/— रूपये तसेच दोन ग्राहकांकडुन १,३५,००० /— रूपये स्विकारले परंतु त्यांना वाहनच दिले नाही. असे एकुण ४६,५३,५७२/— रूपये स्विकारून ग्राहकांच्या मोटार सायकल आरटीओ पासींग व रजिस्ट्रेशन करून न देता पैसा स्वतःच्या फायदयाकरिता वापरून अपहार करून ग्राहकांची फसवणुक केली आहे.

तपासा दरम्यान आरोपीने मा. सत्र न्यायालय, नागपूर कडे अटकपुर्व जामीन मिळण्याकरिता अर्ज सादर केला होता. पोलीसांनी योग्य म्हणणे मांडल्याने आरोपीचा अटकपुर्व जामीन नामंजूर करण्यात आला. अरोली पोलीसांनी आरोपीचा कसुन शोध घेवुन दिनांक २३/०३/२०२५ रोजी आरोपी श्याम धनराज बांडेबुचे याला अटक करण्यात केली आणि मा न्यायालयात हजर केले. मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा यांनी आरोपीस दिनांक २६/०३/२०२५ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केला आहे.

**पोलीस स्टेशन अरोली ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या कडुन जनतेस आवाहन करण्यात येते की, अशाच प्रकारे आरोपी शाम बांडेबुचे याने पैसे स्विकारून वाहन विकले परंतु वाहन पासिंग करून दिले नाही. किंवा वाहनच दिले नाही अशा तक्रारदारांनी तक्रारी करीता पोलीस स्टेशन अरोली येथे येवुन भेटावे किंवा संपर्क साधावा.**

संपर्क क्रमांक — १.  पोलीस स्टेशन आरोली — ०७११५२३५४००

२. श्री स्नेहल राऊत ,प्रभारी अधिकारी,पो स्टे आरोली मो.क्रं —९९२२३११०८५

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर